# नियमीत दिवाणी मुकदमा नं. ३७२/२०१३ मधील नि. ५२ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन की, वादीने प्रतिवादी विरुध्द तहसिलदार सांगोला यांनी दि.३१.०१.२०१३ रोजी आर.टी.एस./कावि/४९०/११ ने दिलेला निर्णय मुलतः बेकायदेशीर आहे असे ठरवून मिळावे म्हणून दावा दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादींनी कैफियत दिली आहे. वादीने दावा दाखल केलेवर उपविभागीय अधिकारी यांचेकडे आर.टी.एस.अपिल क्र.४२/२०१३ दाखल केले होते. सदर अपिलाचा निकाल दि.२९.०६.२०१३ रोजी झालेनंतर दुसरे अपिल क्र.२२६/१३ हे अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे दाखल केले होते. सदर अपिलाचा निकाल दि.२१.०८.२०१५ रोजी झालेनंतर वादींनी परत महसुल मंत्रालय, पुणे येथे आरटीएस रिव्हीजन क्र. २१/२०१५ दाखल केले. त्याचा निकाल दि.२८.०९.२०१८ रोजी झाला आहे. सदर निकालावर वादी यांनी महसुल मंत्रालय यांचेकडे रिव्हीजन अर्ज दाखल केला असून सदर अर्जाचे काम चालू आहे. तहसिलदार सांगोला यांचा आदेश रद्द करुन मागितला असता परत महसुल न्यायाधिकरण यांचेकडे दाद मागितली आहे. वादींना एकच दाद दोन ठिकाणी मागता येणार नाही. तसेच वादींनी दावा दाखल केल्यानंतर अपिल रिव्हीजन केले आहे. सदर अपिले व रिव्हीजन हे मे. कोर्टासमोर आले नाही. त्याकरिता प्रतिवादींना कैफियत कलम १० नंतर नवीन कैफियत कलम १०अ घालून

वरीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. दुरुस्तीने मागणी केलेला मजकुर कैफियतमध्ये समाविष्ट न केल्यास प्रतिवादींना त्यांचा दावा दालविता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे न्यायाचे दृष्टीने प्रतिवादींना कैफियत कलम १० नंतर '१०अ' समाविष्ट करुन वरीलप्रमाणे कैफियतमध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे अर्जावर म्हणणे देण्यात येवून प्रतिवादीचा अर्ज नाकारला आहे. वादींचे म्हणणे की, याकामी मुद्दे निघून दावा चौकशीस आहे. वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. त्यामुळे प्रतिवादीस कैफियतीमध्ये दुरुस्ती करता येणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जाचे व दाव्यातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादीने तहसिलदार यांचा आर.टी.एस./कावि/४९०/११ मधील आदेश बेकायदेशीर आहे असा जाहीर ठराव होवून मिळावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी नि.१४ वर आपली कैफियत दिली असून त्यामध्ये तहसिलदार यांच्या आदेशाविरुध्द वादीने विभागीय अधिकारी, पंढरपूर यांच्याकडे आर.टी.एस.अपिल क्र.४२/२०१३ दाखल केला होता. त्याचा निकाल दि.२९.०६.२०१३ रोजी झाला आहे. त्याविरुध्द जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे दि.२९.०६.२०१३ रोजी अपिल दाखल केले असून त्याचे समन्स अथवा नोटीस प्रतिवादी यांना

मिळाली नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी दि.२५.०४.२०१४ रोजी कैफियत दिली आहे. परंतु अर्जातील कथन पाहता जिल्हाधिकारी यांच्याकडील आर.टी.एस.अपिल क्र.२२६/२०१३ याचा निकाल दि.२१.०८.२०१५ रोजी झाला असून त्या विरुध्द महसुल मंत्रालय यांच्याकडे केलेला रिव्हीजन क्र.२१/२०१५ हे दि.२८.०९.२०१८ रोजी निकाली झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी व महसुल मंत्रालय यांच्याकडील निकाल प्रतिवादी यांनी दाव्यमाध्ये कैफियत दिल्यानंतर झाल्याचे स्पष्ट होत आहे.

५. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये नि.१९ वर दि.२९.०६.२०१६ रोजी मुद्दे काढण्यात आले असून वादीने नि.४० वर आपले पुराव्याचे शपथपत्र दिले आहे. तसेच प्रस्तुतचा दावा उलटतपासाकामी नेमण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांनी आपल्या कैफियतीमध्ये महसुल अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असलेल्या खटल्याबाबत पुर्वीच कथन केले आहे. अर्जामध्ये मागणी केलेले दुरुस्तीचा घटनाक्रम प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केल्यानंतर घडलेला असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादी यांनी कैफियत दाखल केल्यानंतर महसुल अधिकारी यांनी केलेल्या आदेशाबाबतचा घटनाक्रम दुरुस्तीने आपल्या कैफियतीमध्ये सामील करण्याची मागणी करीत आहे. प्रतिवादी हा दुरुस्तीअन्वये कोणतेही नवीन बचाव कैफियतीमध्ये सामील करीत नसून केवळ झालेल्या आदेशाचा घटनाक्रम आपल्या कैफियतीमध्ये सामील करु पाहात आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. तसेच त्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यास आपला पुढील पुरावा देण्याची संधी आहे.

त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, खालील आदेश पारित करीत आहे –

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने अर्जात नमुद दुरुस्ती मुदतीत करुन कैफियतीची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

( **ए.एच.शेख** )

दि.०४.०३.२०२०. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment

a)Name of the Stenographer :A.A.Chavan.

b) Court : 2nd Jt. Civil Court, Sangola

c) Judgment/Order signed by PO on : 04.03.2020

d) Judgment/Order uploaded on : 05.03.2020